महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत नाशिक रोड, नाशिक.

email-dydenskest@yahoo.com dd.nashik@mahedu.gov.in Tel.No.०२५३/२४५४९१० Fax-२४५४८१५

जा.क्र.शिउसं/नावि/स्विय सहा./मित्रउपक्रम/२०२५/ 4910 दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०२५.

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)

जिल्हा परिषद, नाशिक/ धुळे/ जळगांव/ नंदुरबार.

प्रशासन अधिकारी,

महानगर पालिका शिक्षण मंडळ, नाशिक/ मालेगांव/ धुळे/ जळगांव.

विषय : तालुका मित्र समन्वयक म्हणून एका अधिकाऱ्याकडे मित्र उपक्रमाची जबाबदारी सोपविणे व सर्व मुख्याध्यापकांचे ३ तासांचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत.

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०११ (२९६/११)/माशि-३/ दिनांक ०५ ऑक्टोंबर, २०११

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक संकीर्ण-२०११/२९६/११/माशि-३/मंत्रालय, दिनांक २७ जानेवारी, २०१२.

३. मा.शिक्षण संचालनालय (माध्य.व उच्च माध्य.) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक दि. ११ जुलै, २०१२.

४.या कार्यालयाचे पत्र क्र.शिउसं/नावि/स्विय सहा./मित्रउपक्रम/२०२५/४८५४/ दिनांक १५ऑक्टोंबर, २०२५.

उपरोक्त संदर्भीय विषयांकित पत्रान्वये आनापान साधना बाबत (विपश्यना साधनेची पहिली पायरी) आपल्या जिल्हयातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळेतील इ. ५ वी ते १२ वीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांकरीता मित्र उपक्रम प्रभावीपणे राबविण्याकरीता आपल्या सर्व तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांच्यामार्फत एक जबाबदार शिक्षण विस्तार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी व त्याबाबतचा अहवाल त्वरीत या कार्यालयास परिशिष्ट-१ प्रमाणे सादर करावा, तसेच तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांचे आनापान प्रशिक्षण कार्यशाळा ( ३ तास) आयोजित करून परिशिष्ट-२ प्रमाणे माहिती दिनांक १०.१२.२०२५ पर्यत सादर करावी.

सोबत : परिपत्रक

(संजयकुमार राठोड)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक.

प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर.

१. मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.विभागीय आयुक्त (महसूल) नाशिक विभाग, नाशिक.
३. मा.आयुक्त, महानगर पालिका, नाशिक/ मालेगांव/ धुळे/ जळगांव
४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक/ धुळे/ जळगांव/ नंदुरबार.
५. मित्र उपक्रम कार्यशाळा संपर्क श्री.उल्हास फुलझेले-मो.नं.९५२७३९१७७०/९०२२७०८११८

**मित्र उपक्रकांतर्गत कामे.**

१. तालुक्यातील मित्र उपक्रम कार्यान्वित आणण्यासाठी कमीत कमी एक वेळा १० दिवसांचा विपश्यना साधना अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांची शाळा निहाय यादी तयार करणे.

२. तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांसाठी ३ तासाचे अनापान प्रशिक्षण कार्यशाळा (सन-२०२५-२६) आयोजित करावी.

३. मुख्याध्यापकांनी आनापानाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्यांच्यामार्फत अन्य सर्व शिक्षकांना याबाबतचे ३ तासांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्याविषयी कार्यवाही करावी.

४. मुख्याध्यापकांनी इ. ५ वी ते १० वीतील सर्व विषार्थ्यांना ७० मिनिटांचे आनापान तसेच शाळा सुरू होतांना व शाळा सुटण्यापूर्वी दर दिवशी १० मिनिटे मित्र साधनेचा (आनापान) अभ्यास सुरू होईल याची खात्री करून तसा अहवाल शाळेकडून मागवावा.

५. दरवर्षी मित्र उपक्रम उजळणी वर्ग घेवून योग्य रितीने संबंधीत शाळेत मित्र उपक्रम सुरू असल्याची खात्री करून अहवाल जिल्हा समितीला पाठवावा.

६. तालुक्यातील मित्र उपक्रम जलदगतीने कार्यान्वित आणण्यासाठी १० दिवस विपश्यना साधना करण्यास इच्छूक शिक्षकांची यादी तयार करावी व त्यांचे शिबिर पूर्ण करण्यासंबंधीची कार्यवाही पूर्ण करावा.

७. स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरसकाराच्या निकषात शिक्षकांचे मित्र उपक्रमांतील योगदान अंर्तभूत करावे.

८. शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रत्येक भेटी अंती शाळेच्या अभिप्राय नोंदवहीत मित्र उपक्रम अंमलबजावणीची नोंद घेतली असल्याची खात्री करून घेणे.

## परिशिष्ट-१

मित्र उपक्रमांतर्गत जिल्हा------------------------

तालुक्यातील नियुक्त जबाबदार शिक्षण विस्तार अधिकारी

| अ.क्र. | तालुका | नियुक्त केलेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्याचे पूर्ण नांव | मोबाईल क्रमांक | ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, --------------

## परिशिष्ट-२

मित्र उपक्रमांतर्गत जिल्हा -------------

| अ.क्र. | तालुका | एकूण शाळा इ. ५ वी ते १० वी व इ. ५ वी ते ७ वी | एकूण विद्यार्थी इ. ५ वी ते १० वी व इ. ५ वी ते ७ वी | तालुक्यतील प्रत्यक्ष १० मिनिटे २ वेळा आनापान साधना करीत असलेल्या एकूण शाळा | तालुक्यातील प्रत्यक्ष १० मिनिटे २ वेळा आनापान साधना करीत असलेले एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, --------------

**महानगर पालिका शिक्षण मंडळ-----------------**

| अ.क्र. | मनपा/नपा | संपूर्ण नांव व पत्ता | मोबाईक क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

प्रशासन अधिकारी,
महानगर पलिका शिक्षण मंडळ-----------